# घराच्या सुरक्षेसाठी चेकलिस्ट

अर्पण
बाल लैंगिक शोषणापासून मुक्तिकडे

CHILD SAFETY WEEK
14TH - 20TH NOVEMBER




बाल लैंगिक शोषणाविषयी स्वत:ला शिक्षित करा.




घरातील प्रत्येकाला बाल लैंगिक शोषणाविषयी शिक्षित करा आणि त्यांना बाल सुरक्षेमध्ये सहभागी करा.




तुमच्या मुलांना वैयक्तिक सुरक्षा नियम शिकवा - आणि सांगा की ते त्यांच्या शरीराचे मालक आहेत, त्यांना नाही म्हणण्याचा अधिकार आहे आणि जर त्यांना कधीही असुरक्षित वाटले तर ते मदतशील मोठ्या व्यक्तीला याविषयी सांगू शकतात.




मुलांना पुन्हा-पुन्हा सांगा आणि या गोष्टीची जाणीव करून द्या की वैयक्तिक सुरक्षा ही अत्यंत महत्त्वाची असून जर त्यांच्यासोबत कोणीही कोणतेही अयोग्य वर्तन केल्यास तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवाल.




स्पर्शाशी संबंधित सुस्पष्ट कौटुंबिक मर्यादा ठरवा.




जेव्हा तुमची मुले नजरेआड खेळत असतील तेव्हा त्यांच्यावर लक्ष ठेवा आणि ती नेमकी कुठे आहेत ह्याविषयी जागृत राहा.




ज्या व्यक्ती तुमच्या मुलांसोबत असतात अशा व्यक्तींबाबत विशेष खबरदारी घ्या.




तुमच्या मुलांच्या भावना ऐका आणि स्वीकारा आणि एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या सहवासात तुमच्या मुलांना भीती, गोंधळ किंवा अस्वस्थतेसारख्या भावना तर जाणवत नाहीत ना याची खात्री करून घ्या.




मुलाबाबतीत काही चिंताजनक बाबी दिसून येत असल्यास त्याचे अजून काही नुकसान होण्याची वाट न बघता त्वरित मदत मागा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्या.




जवळच्या स्थानिक यंत्रणा आणि त्यांच्या सेवांचा लाभ कसा घ्यायचा याबाबतची माहिती मिळवा.